# विनवणी

तुला घेतल्याविन नाही परतणे
फुला उमलल्यावीन राही पूजणे ||धृ||

असेल जरी मी टाकून बोललो
आग अति आणि उगीच पाखडलो
कृद्ध लाल रक्ती नेत्री उतरलो
पाऱ्या परी काच फोडून फाटलो
आत्मकोप तो उगीच तुझे ते स्थळी सापडणे ||१||

वाटले तुला हे अति जाहले
आत्म सन्मानी असह्य वाटले
नाती मैत्रीच्या सिमे पलीकडले
स्नेह प्रेमा प्रती प्रतारणेतले
मान्य मला मज मन मनकवडे ||२||

जागी अगर मी तुझ्या असतो
तोंडी लगाम शकलो नसतो
स्वयी संयमी अपुरा पडतो
लाही समान कढई  फुटतो
तेली अग्नी भडके तो पाणीच विझवणे ||३||

तोंडी कुठल्या माफी मागू
हाती कशीया क्षमा याचू
गुढघे टेकून नत मस्तकू
नीर नेत्री आर्त आळवू
पाझर फुटल्यावीन न उठणे हे धरणे ||४||

आण तुला आपल्या प्रेमाची
अनुभवलेल्या अत्युच्च क्षणांची
शुभ्र स्फटीकी चांदण्याची
धुंद नशिल्या रातराणीची
अमोल आठवणींनी आता अंमल रागाचा उतरू दे  ||५||

चित्र अधुरे राही रेखिले
रंग तयांचे नाही गहिरे
गीत ह्रिदयी ऐकी आतले
कष्ट कंठी कानी खटके
कोमल तलम तुझ्या सुरांनी चिंब मला नाहु दे ||६||

**रवींद्र गाडगीळ**